उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**पत्र ६, महिना – जुलै २०१७**

**हे वार्तापत्र शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांसाठी आणि शिक्षणात रस असणाऱ्यांसाठी**

# बिडे वार्तापत्र

**बिडे (कोरकू) = उठा (मराठी)**

==========================

## आश्रमशाळेतील शिक्षणाची कहाणी

प्रत्येक पालकाला आपल्या मुलास चांगले शिक्षण मिळावे असेच वाटत असते, कारण शिक्षणाला खुप महत्व आहे, त्यामुळे प्रत्येक पालक आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी वाटेल ते करण्यास तयार असतात, त्याकरिता मुलांचा चांगल्या शाळेत प्रवेश व्हावा त्याकरिता पालक रात्र रात्र भर जागरण करून मुलाचा प्रवेश चांगल्या शळेत करतात, भरमसाठ शुल्क देतात, या व अशा कितीतरी अडचणींचा सामना पालकांना करावा लागतो, का तर शिक्षण चांगले मिळावे म्हणून.

अकोट तालुक्यातील झुमरीतलैय्या गावात पालकांशी चर्चा करीत असतांना, एक पालक सांगत होते, की त्यांची दोन मुले आश्रमशाळेत आहेत, पण ती दिवाळी नंतर शाळेत जात नाहीत. मग मी त्यांना म्हटले की “तुम्ही मुलांना शाळेत का पाठवत नाहीत ? शहरात तर पालक मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, त्याकरिता किती दक्ष असतात” हे ऐकून ते म्हणाले की, “कोणत्याही पालकाला असेच वाटते, की माझा मुलगा चांगला शिकावा. म्हणून तर मीही माझी मुले आश्रमशाळेत पाठवली. पण तिकडे शाळा म्हणावे असे काही नाही. तेथील वातावरण चांगले नाही, तेथे मुलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, जसे जेवण चांगले नसते, झोपायला खोली व्यवस्थित नाही, पावसाळ्यात पाणी खोलीमध्ये येते, झोपायला अडचण होते, खेळण्यासाठी खेळाचे साहित्य नाही. या व अशा कितीतरी समस्या आश्रमशाळांमध्ये आहेत. त्यामुळे मुलांचे शिकण्याकडे, अभ्यास करण्यासाठी मन लागत नाही. दिवाळीनंतर बरीच मुलं आश्रमशाळांमध्ये जात नाही, कारण त्यांना आश्रमशाळा आवडत नाही, त्यांचं मन लागत नाही, त्यामुळे मुलांना शाळेत पाठवण्याचा कितीही प्रयत्न केला तरी मुलं जात नाही, काय करावं काही समजत नाही. असच जर राहिलं तर मुलं कशी शिकतील? शासनाने शाळा सुरु केल्यात तर त्या चांगल्या सुविधा द्याव्यात ना ? त्यामुळे मुले चागंले शिकतील नी शाळेत टिकतील सुद्धा. सरकारने याकडे लक्ष द्यायला हवे, नाहीतर असं वाटतं की, शहरातली मुल आहेत, आणि आमचे काय मुले नाहीत का ? आमची पण मुलेच आहेत!”

**आश्रमशाळांबाबत तक्रारी येथे करू शकता:**

श्री प्रवीण घुगे, अध्यक्ष, राज्य बाल हक्क आयोग,

तिसरा मजला, शासकीय वाहतूक सेवा इमारत, सर पोचखानवाला रस्ता, वरळी, मुंबई ४०००३२

फोन क्र. - ०२२ २४९२०८७९

**तक्रारीची एक प्रत पुढील ठिकाणी पाठवावी:**

निमंत्रक, महाराष्ट्र शिक्षण हक्क मंच, NCAS ऑफिस, सेरेनिटी इमारत, रामनगर कॉलनी, पाषाण रस्ता, पुणे ४०००२१

तक्रार लेखी करावी. तक्रारीची एक प्रत स्वत:कडे ठेवावी. तक्रारीचे उत्तर एक महिन्यात न आल्यास पुन्हा आठवण करणारे पत्र पाठवावे.

# शाळा समिती सदस्यांचे काम

**शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांनी अधून मधून शाळेला भेटी देणे आवश्यक आहे.** या भेटीमध्ये त्यांनी अनेक गोष्टी पहाव्यात, जसे -

**भौतिक व इतर सुविधांचे निरीक्षण:**

शिक्षण हक्क कायद्यानुसार पुढे दिलेल्या बाबी व सुविधा शाळेत असायलाच हव्यात. आपण मुलांशी बोलून, निरीक्षण करून, शिक्षकांशी बोलून या बाबी तपासाव्यात:

- मुलांना पिण्यासाठी पुरेसे, स्वच्छ पाणी आहे का?
- मुलांचे व मुलींचे स्वच्छतागृह स्वच्छ आहे का, ते वापरात आहे का ? तेथे वापरण्यासाठी भरपूर पाणी आहे का ?
- मुलामुलींशी बोलून ती स्वच्छतागृहाचा वापर केल्यानंतर साबणाने / राखेने हात धुतात का, साबण राख उपलब्ध आहे का, हे जाणून घ्या.
- शाळेच्या खोल्या, शाळेचा परिसर स्वच्छ आहेत का, वर्गात कचरापेटी आहे ना....
- शाळेच्या इमारतीस दुरुस्तीची गरज आहे का, फरशा उकरलेल्या नाहीत ना, छत गळत नाही ना, शाळेचे दरवाजे व खिडक्या नीट आहेत ना, भिंत पडकी नाही ना...
- शाळेला कुंपण आहे का. शाळेच्या आवारात गुरे हिंडत नाहीत ना, शाळेत चिखल होत नाही ना, शाळेला बगीचा आहे का, बगीच्याची काळजी घेतली जाते का...
- शाळेत खेळण्याची साधने आहेत का, मुले ती वापरतात का...
- शाळेला मैदान आहे का, मुले मैदानात खेळतात का...
- शाळेत वाचनालय आहे का, मुलांना आवडणारी
- पुस्तके शाळेत वाचनालय आहे का, मुलांना आवडणारी त्यात आहेत का, मुलांना गोष्टींची पुस्तके वाचायला मिळतात का....
- वर्गखोल्या पुरेशा आहेत का, की मुले वर्गात दाटीवाटीने बसत आहेत?
- सतरंज्या आहेत का, त्या स्वच्छ आहेत का?

या सर्व गोष्टींची पूर्तता करणे ही सरकारची जबाबदारी आहे. यापैकी काही सुविधा तुमच्या शाळेत नसतील तर शाळेने तसा प्रस्ताव शिक्षण विभागाला पाठवला आहे का? प्रस्ताव पाठवूनही पैसे मिळत नसतील तर ग्रामपंचायत निधी उपलब्ध करून देईल का, आमदार किंवा खासदार निधी मिळवण्याचा प्रयत्न करावा.

मी अकोट तालुक्यातील एका गावात शाळा भेटीला गेलो होतो, मी शाळेत अर्धा तास होतो, एवढ्या वेळेत मुलांचा आवाज, तेथील वातावरण, वर्गातील साहित्य माझ तर डोकच दुखायला लागलं होतं. तेथील शाळेला फक्त दोनच वर्गखोल्या आहेत, आणि शाळेचा पट १२५. शाळा पहिली ते आठवी पर्यंत आहे, कसं शिक्षण होत असेल त्यांचं, कल्पनाच करवत नाही. मुख्याध्यापकांशी चर्चा करत होतो, ते सांगत होते, “शाळा बांधकामासाठी पैसे आले होते, पण जागा नसल्याने ते परत गेले, आता ही शाळा पडून याच्यावर नवीन दुमजली इमारत बांधकामासाठी प्रस्ताव दिला आहे, वाट पाहत आहोत, की कधी मंजूर होईल. तसेच पालकांनी शाळेसाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे, कारण शौचालयांच्या भिंतींच्या काही विटा निघाल्या होत्या, तर लोकांनी पूर्ण भिंतींच्या विटा काढून नेल्या, दरवाजा तोडून टाकला, वर्गाच्या खिडक्यांच्या पाट्या काढून टाकल्या, सांगा कसं करावं, आमच्या शाळेत जर कुणी बाहेरचे पाहुणे आले, तर त्यांची कशी सोय करावी? आम्ही शाळा असेपर्यंत लक्ष ठेवतो, पण त्यानंतर गावकऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे, नाही का ?”

> शाळेत आपलीच मुले जातात, तर मग शाळा स्वच्छ, साफ राहील हे पाहणे पालकांचे काम नाही का? शाळेतील वस्तूंची चोरी होत नाही, हे पण पालकांनीच पाहायला हवे ना?